# जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना

**योजनेचे नाव :-** जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना

**विभागाचे नाव:-** मृद व जलसंधारण विभाग

- **शासन निर्णय :-** दिनांक 2 जानेवारी 2018.
- **उद्देश :-** राज्यातील सुशिक्षीत बेरोजगार तरुण / शेतकरी उत्पादन संघ / नोंदणीकृत शेतकरी गट / बेरोजगारांची सहकारी संस्था यांचे मार्फत जलयुक्त शिवार अभियान /जल व मृद संधारणाची कामे करण्यासाठी शासना मार्फत "जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्र सामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना"कार्यान्वीत करण्यांत आली आहे.
- **लाभार्थी निकष :-**
  1. सुशिक्षित बेरोजगार
  2. शेतकरी उत्पादक कंपनी
  3. बेरोजगारांची सहकारी संस्था.
  4. नोंदणीकृत गट शेती
  5. विविध कार्यकारी सहकारी संस्था
- **लाभाचे स्वरुप :-**

  या योजनेकरीता घेतलेल्या रु. 17.60 लाख कमाल मर्यादेच्या कर्ज रक्कमेवर व्याज परतावा दिला जाईल. त्यानुसार शासनामार्फत 5 वर्षाची कमाल व्याज परतावा रक्कम रु.5.90 लाख इतकी अनुज्ञेय राहील. रु.17.60 लाख इतक्या रक्कमेच्या वरील व्याजाच्या येणा-या रक्कमेचा परतावा शासनाकडुन अनुज्ञेय नसेल.
- **अंमलबजावणीची कार्यपध्दती :-**
  1. योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास नोडल एजन्सी म्हणुन घोषित करण्यात आले आहे.
  2. सदरील योजना ही जिल्हास्तरावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे.
  3. योजनेमध्ये लाभार्थ्यांना उत्खन यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थांकडुन उपलब्ध करुन देण्यात येणा-या कर्जावरील व्याजाचे दायित्व शासनामार्फत अदा करण्यात येत आहे.
  4. शासनामार्फत अदा करण्यात येणा-या व्याजाची रक्कम कमाल रु.5.90 लाख असेल व सदरील रक्कम 5 वर्ष कालवधीमध्ये समान हफ्त्यात कमाल रु.9833/- प्रमाणे नियमीत कर्ज रक्कम परतफेड केलेल्या लाभार्थ्यांना वर्ग करण्यात येत आहे.
  5. जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजनेंतर्गत सन 2018-19 व 2019-20 मध्ये एकुण 318 लाभार्थ्यांची निवड करण्यात आली .

**सध्यस्थितीतील प्रगती अहवाल :-**

- जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजनेंतर्गत राज्यातील 318 लाभार्थींना सन 2018-19 ते सन 2023-24 या कालावधीत रु.13.07 कोटी इतका निधी लाभार्थी यांना वर्ग करण्यात आला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | वर्ष | वितरीत अनुदान (रू. लाखात) |
|---|---|---|
| 1 | सन 2018-19 | 91,54,523/- |
| 2 | सन 2019-20 | 2,18,98,091/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | सन 2020-21 | 94,79,012/- |
| 4 | सन 2021-22 | 4,90,17,505/- |
| 5 | सन 2022-23 | 2,05,85,227/- |
| 6 | सन 2023-24 | 2,05,82,942/- |
| | **एकुण** | 13,07,17,300-/ |